# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

क्र:मविनिआ/माअअ/३०/२०१७/०1754

दि. ३१.०३.२०१७

प्रति,
श्री जगनसिंह राजपूत
ओमसाई निवास,
बॅरेक नंबर ८, रुम नंबर ४
उल्हासनगर - १, जि. ठाणे

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळणेबाबत...**

महोदय,

आपला दि. ६ मार्च, २०१७ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ७ मार्च २०१७ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, आपणांस आवश्यक असलेल्या माहितीचा खुलासा खालीलप्रमाणे आहे. आपण दि. २९.०२.२०१६ रोजी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित., यांना अग्रेषित केलेले पत्र आयोगाच्या कार्यालयास दि.१ मार्च २०१६ रोजी प्राप्त झाले.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ही एक अर्ध न्यायिक संस्था असल्यामुळे अशा आलेल्या पत्रांवर कोणतीही कार्यवाही करत नाही. आपणास कळविण्यात येते की, जर ग्राहकांच्या वैयक्तिक स्वरुपाच्या तक्रारी असतील तर त्यासाठी आयोगाने ग्राहक तक्रार निवारण या यंत्रणेची निर्मिती केलेली आहे (CGRF) प्रकरणारुप ग्राहक त्यांच्या तक्रारीसाठी या यंत्रणेकडे दाद मागू शकतो.

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक अयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

प्रमोहरे

(प्रदीप मोहरे)
कक्ष अधिकारी तथा जन माहिती अधिकारी

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in